भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, वानाडोंगरी ता.हिंगणा जि.नागपूर या वसतीगृहाच्या नवीन इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीएच-२०१७/प्र.क्र.१९६/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १२ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/ प्र.क्र.१६३/ बांधकामे, दि.९/१०/२०१५.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१५/ प्र.क्र.४११/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.
३) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ मुलींचे शावगृ/वानाडोंगरी हिंगणा/प्र.मा.प्रस्ताव/का-५/२०१६-१७/१३५६ दि.३/५/२०१७.

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्ताने राज्यामध्ये मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे,म्हणून मुलींसाठी विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा व तालुका स्तरावर ४३ अशी एकूण ५० ठिकाणी मागासवर्गीय मुलींसाठी नवीन शासकीय वसतीगृहे सुरु करण्यास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये, शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सादर केलेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, वानाडोंगरी ता.हिंगणा जि.नागपूर या नवीन शासकीय वसतिगृहाच्या इमारत बांधकामासाठी रू.८,७१,९४,७६९/- (रूपये आठ कोटी एकाहत्तर लक्ष चौ-याण्णव हजार सातशे एकोणसत्तर फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, वानाडोंगरी ता.हिंगणा जि.नागपूर या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या रुपये रू.८,९१,५३,४६४/-(रूपये आठ कोटी एक्याण्णव लक्ष त्रेपन्न हजार चारशे चौसष्ट फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय

मान्यतेकरिता शासनाकडे पाठविले आहे. तद्नुषंगाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या दि.१५.०२.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रू.८,७१,९४,७६९/-(रूपये आठ कोटी एकाहत्तर लक्ष चौ-याण्णव हजार सातशे एकोणसत्तर फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास पुढील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. :-

अ) सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.

ब) बांधकाम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा, तसेच विस्तृत नकाशास वास्तु विशारदाकंडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

क) बांधकाम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

ड) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी वसतीगृहासाठी आवश्यक सोयी सुविधाचा अंर्तभाव करुनच विस्तृत अंदाजपत्रक तयार करुन काम हाती घ्यावे.

इ) प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१ दि.१०.१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ई) तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रक संबंधित मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग तसेच उपभोक्ता विभागाच्या वतीने सक्षम अधिकाऱ्याकडून सांक्षांकित करुन घेणे आवश्यक आहे.

२. मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, वानाडोंगरी ता.हिंगणा जि.नागपूर या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करुन, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करुन विहीत प्रक्रियेनुसार ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ करावी.

३. या वर होणारा खर्च मागणी क्र.एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९- अनुसुचित जाती घटक योजना, ०२- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे, (योजनांतर्गत - दत्तमत) लेखाशीर्ष-२२२५-डी-८२३ या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४, अ.क्र.१ मधील अट क्र.११ नुसार दिनांक १५.०२.२०१८ रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३१३१५३६२५६०२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.13 15:38:23 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, आयुक्तालय, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे/नागपूर.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर .
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१०) निवडनस्ती.